राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी

नवी मुंबई महानगरपालिका

नवी मुंबई महानगरपालिका, एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विभागामार्फत विविध संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता खालील नमुद आरक्षणानुसार पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात टंकलिखित स्वरुपात अर्ज मागविण्यात येत असून रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | आरक्षित पदे | | | | | | | | | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इमाव | विमाप्र | खुला | |
| १ | वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ) | १ | १ | १ | - | - | - | १ | - | ४ | ८ |
| २ | वैद्यकीय अधिकारी (अर्धवेळ) | १ | १ | १ | - | - | - | २ | - | ६ | ११ |
| ३ | स्टाफ नर्स | ३ | २ | - | - | - | - | ४ | - | ८ | १७ |
| ४ | ए.एन.एम. | ४ | ४ | - | २ | २ | २ | १४ | - | २१ | ४९ |
| ५ | लॅब टेक्निशियन (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) | १ | १ | १ | - | - | - | २ | - | ३ | ८ |
| ६ | फार्मासिस्ट (मिश्रक/औषध निर्माता) | - | १ | - | - | - | - | १ | - | १ | ३ |
| | एकूण | | | | | | | | | | ९६ |

वर नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक पदाची शैक्षणिक अर्हता, आवश्यक अनुभव, वयोमर्यादा, सर्वसाधारण सुचना, अर्जाचा नमुना, प्रतिज्ञापत्र, इत्यादी सविस्तर माहिती www.nmmc.gov.in या संकेत स्थळावर Jobs या लिंक द्वारे उपलब्ध आहे.

तरी उपरोक्त पदाकरीता इच्छूक उमेदवारांचे अर्ज विहित नमुन्यात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) दि.३०/१२/२०१७ पर्यंत वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, तिसरा मजला, से.१५ऐ, नवी मुंबई महानगरपालिका, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे स्विकारले जातील. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव**
**एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**नवी मुंबई महानगरपालिका**
**एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी**
**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान**

नवी मुंबई महानगरपालिका, एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विभागामार्फत विविध संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता त्यासाठी दर्शविलेली अर्हता धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात टंकलिखित स्वरुपात अर्ज मागविण्यात येत असून रिक्त पदांचा आरक्षण तपशिल, शैक्षणिक अर्हता, ठोकमानधन, नियुक्तीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

**१. वैद्यकीय अधिकारी (पुर्ण वेळ) दर महा एकत्रित मानधन रु.४५,०००/- एकुण पद संख्या ( ८ )**

| | आरक्षित पदे | | | | | | | | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इमाव | विमाप्र | खुला | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | - | - | - | १ | - | ४ | ८ |
| शैक्षणिक अर्हता | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी.<br>ब) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी/नुतणीकरण बंधनकारक<br>क) शासकीय/स्थानिक संस्था/ट्रस्ट /खाजगी यांचा संबंधित क्षेत्रातील अनुभव आवश्यक | | | | | | | | | |

**२. वैद्यकीय अधिकारी (अर्ध वेळ) दर महा एकत्रित मानधन रु. २८,३५०/- एकुण पद संख्या ( ११ )**

| | आरक्षित पदे | | | | | | | | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इमाव | विमाप्र | खुला | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | - | - | - | २ | - | ६ | ११ |
| शैक्षणिक अर्हता | अ) विशेषज्ञ (Gynecologist, Surgeon, physician, Pediatrician इ. तज्ञांचा समावेश)<br>ब) विशेषज्ञ उपलब्ध न झाल्यास एम.बी.बी.एस. विचारात घेण्यात येईल.<br>ब) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी/नुतणीकरण बंधनकारक<br>क) शासकीय/स्थानिक संस्था/ट्रस्ट /खाजगी यांचा संबंधित क्षेत्रातील अनुभव आवश्यक | | | | | | | | | |

**३. स्टाफ नर्स दर महा एकत्रित मानधन रु.१२,०००/- एकुण पद संख्या ( १७ )**

| | आरक्षित पदे | | | | | | | | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इमाव | विमाप्र | खुला | |
| सर्वसाधारण | ३ | २ | - | - | - | - | ४ | - | ८ | १७ |
| शैक्षणिक अर्हता | अ) १२ वी उत्तीर्ण आणि जनरल नर्सिंग आणि मिड वाईफ डिप्लोमा<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी/नुतणीकरण बंधनकारक<br>क) अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | | | | | | | | | |

**४. ए.एन.एम. दर महा एकत्रित मानधन रु.८,६४०/- एकूण पद संख्या (४९ )**

| | आरक्षित पदे | | | | | | | | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इमाव | विमाप्र | खुला | |
| सर्वसाधारण | ४ | ४ | - | २ | २ | २ | १४ | - | २१ | ४९ |
| शैक्षणिक अर्हता | अ) १० वी उत्तीर्ण आणि ए.एन.एम. कोर्स उत्तीर्ण<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी/नुतणीकरण बंधनकारक<br>क) अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | | | | | | | | | |

**५. लॅब टेक्निशियन (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) दर महा एकत्रित मानधन रु.८,४००/- एकूण पद संख्या (८)**

| | आरक्षित पदे | | | | | | | | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इमाव | विमाप्र | खुला | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | - | - | - | २ | - | ३ | ८ |
| शैक्षणिक अर्हता | अ) १२ वी सायन्स उत्तीर्ण<br>ब) शासन मान्यता प्राप्त विद्यापिठाची बी.एस.सी (मेडिकल लॅब टेक्नोलॉजी) किंवा शासनमान्य वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ विषयातील पदविका (डी.एम.एल.टी.) उत्तीर्ण<br>क) अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | | | | | | | | | |

**६. फार्मासिस्ट (मिश्रक /औषध निर्माता) दर महा एकत्रित मानधन रु.१०,०००/- एकूण पद संख्या ( ३ )**

| | आरक्षित पदे | | | | | | | | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इमाव | विमाप्र | खुला | |
| सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | १ | - | १ | ३ |
| शैक्षणिक अर्हता | अ) १२ वी सायन्स उत्तीर्ण<br>ब) शासनमान्य विदयापीठाचा बी. फार्म पदवीधर किंवा डी. फार्म उत्तीर्ण<br>ब) फार्मासी कॉन्सील नोंदणी /नुतणीकरण बंधनकारक.<br>क) अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | | | | | | | | | |

**सर्वसाधारण अटी :-**

१) अर्ज पाठविण्याची अंतिम तारीख :- दि. ३०/१२/२०१७ (३० डिसेंबर २०१७)

२) अर्ज पाठविण्याचे ठिकाण :- आरोग्य विभाग, तिसरा मजला, नमुंमपा मुख्यालय, से. १५ अे, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

३) वयाची अट - सर्व पदांकरीता उमेदवारांचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे. खुल्या प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे अशी आहे.

४) उक्त अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात टंकलिखित स्वरुपात आपला अर्ज आवश्यक सर्व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, जन्मदाखला/जन्मतारखेचा पुरावा, अनुभवाचे प्रमाणपत्र, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रतीसह सादर करावा.

५) उपरोक्त कागदपत्रामध्येच उमेदवाराचे पूर्णनावासहित व पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता लिहिलेले १५ x २१ चा रिकामा लिफाफा पाठविणे आवश्यक आहे, जेणेकरुन त्यामध्ये मुलाखतीकरीता उपस्थित राहण्यासाठी पत्र पाठविण्यात येईल.

६) सर्व कागदपत्रे एका बंद लिफाफामध्ये देण्यात यावी.

७) अर्ज विहित नमुन्यात टंकलिखित सर्व दुष्टीने पूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

८) पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पुर्ण असावा.

९) एकूण पदांच्या प्रमाणात जास्त उमदेवार आल्यास संवर्गनिहाय मुळ किमान शैक्षणिक अर्हता धारण केल्यानुसार प्राप्त गुण व गुणवत्ता याचा विचार करुन मुलाखतीस एका पदासाठी पाच उमेदवार याप्रमाणे उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

१०) उमेदवारांची छाननी एकास पाच उमेदवार या प्रमाणे पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार करण्यात येईल. उच्च अर्हता व अनुभवी उमेदवारांस प्रथम प्राधान्य राहील.

११) उमेदवारांच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचे विशेषज्ञनिहाय Skill Assessment Protocol प्रमाणे मुल्यमापन करण्यात येईल व त्याआधारावर पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.

१२) निवडीसाठी पात्र उमेदवारांची कौशल्य व प्रात्यक्षिक चाचणी परिक्षेत प्राप्त होणाऱ्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

१३) समान गुण झाल्यास उमेदवाराच्या पदवीच्या गुणांनुसार प्राधान्य क्रम देण्यात येईल.

१४) उमेदवाराने अर्ज भरण्यापूर्वी सदर पदाची अर्हता व अटी पुर्ण करीत असल्याची खातरजमा करावी.

१५) उमदेवार विहित अर्हता व अटी पुर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमदेवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१६) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास, उमदेवाराने त्याबाबतचा तपशिल देणे आवश्यक आहे.

१७) निवड झालेल्या उमेदवारांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ना.प्रा.आ.केंद्र कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा ना.प्रा.आ.केंद्राच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल.

१८) उमेदवाराने विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. तसेच निवड प्रक्रिया सुरु झाल्यावर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर केल्याचे अथवा आढळून आल्याचे किंवा माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली झाली असल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१९) भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदाच्या संख्येत बदल करणे, पदांची संख्या बदल करणे, परीक्षा/भरतीची कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे व अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष, एआकुकसो यांना असतील.

२०) उक्त रिक्त पदे नवी मुंबई महानगरपालिका नियमित आस्थापनेवरील नसून निवड करण्यात आलेल्या उमदेवारास नमुंमपा आस्थापनावर नियमित करुन घेण्याचा हक्क सांगता येणार नाही. तसेच सदरची सेवा आपोआप खंडीत होईल.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव**
**एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी**
**नवी मुंबई महानगरपालिका**

# अर्जाचा नमूना

(---------------------------या पदासाठी अर्ज)

पासपोर्ट आकाराचा
फोटो चिकटवून
साक्षांकित करावा

प्रति,
वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव,
एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण सोसायटी,
नवी मुंबई महानगरपालिका.

१. संपुर्ण नाव :--------------------------------------------------------------------------------
(प्रथम आडनाव)

२. पत्ता :--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

३. दुरध्वनी क्र. :१. ------------------------------------२. -----------------------------------------

४. जन्मतारीख :- ---------------- दि. ३०/११/२०१७ रोजीचे वय ---------- राष्ट्रीयत्त्व :- -------------

५. उमेदवार विवाहीत /अविवाहित:------------------------------------------------------------------------------

६. अ) जात :- --------------- ब) जात वैधता प्रमाणपत्र :- आहे/नाही

७. धर्म :- ------------------------------------------------------------------------------

८. ई-मेल आयडी :- ------------------------------------------------------------------------------

९. खाली नमूद केलेल्या प्रवर्गापैकी योग्य चौकोनात √ अशी खुण करावी.

| अ.जा | अ.ज | वि.जा(अ) | भ.ज(ब) | भ.जा (क) | भ.ज(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

१०. शैक्षणिक अर्हता :-

| उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ /मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकूण मिळालेले गुण | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११. अनुभव :-

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |

१२. अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

१३. आपणा विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालू आहे काय?
होय/नाही
(असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

१४. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैधता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकराक आहे)

| | |
|---|---|
| १) | ४) |
| २) | ५) |
| ३) | ६) |

वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशिर कारवाई होईल याची मला जाणिव आहे.

ठिकाण:-

दिनांक:-

( अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )

प्रतिज्ञापत्र

(विवाहीत उमेदवारांसाठी)

नमुना-अ

(नियम ४ पहा)

मी श्री/श्रीम. ---------------------------------------------------श्री. -------------------------------------
यांचा/यांची मुलगा/पत्नी वय--------वर्षे राहणारा------------------ याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी---------------------------------या पदासाठी माझ्या अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ------------------(संख्या) इतके मुले हयात आहेत. यापैकी दि.३१ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --------आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा )

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनापेक्षा अधिक असेल तर ३१ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदांसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.

ठिकाण:-

दिनांक:-

सही-----------------------------------

(                                        )